कोल्हापूर

...केली.

ना. आठवले हे अमरावती महापालिकेच्यावतीने

जनधन योजना ... यावेळी वाचला.

# शुक्रवारी १७५ अर्ज

नांदेड, दि. २२ : महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी २० प्रभागात शुक्रवारी (दि.२२) सहा केंद्रांवरील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे एकूण १७५ उमेदवारी अर्ज दाखल झाले. यापूर्वीचे २५ आणि आजचे १७५ असे एकूण २०० अर्ज दाखल झाले आहेत.

उद्या शनिवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. या कालावधीमध्ये राजकीय पक्षांनी आपल्या अधिकृत उमेदवारांचे जोडपत्र १ व २ ची कागदपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मनपा आयुक्तांकडे प्रत्यक्ष उपस्थित राहून सादर करायचे आहेत. ऑनलाईन अर्ज नोंदणी करून त्याच्या प्रिंटवर स्वाक्षरी केल्याशिवाय निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे अर्ज स्वीकारल्या जाणार नाही. तसेच फक्त ऑनलाईन भरलेले अर्ज छाननीसाठी व निवडणुकीसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत, असे मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी सांगितले.

नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी निवडणूक आयोगाने सात दिवसाचा कालावधी निश्चित केला असून त्यातील सहा दिवस कामकाजाचे होते. त्यामुळे ऑनलाईन स्वरूपात अर्ज भरण्याकरीता इंटरनेट स्पीड किंवा वेबसाईटच्या सर्व्हरबाबत कोणतीही समस्या अथवा तक्रार अपेक्षित नाही. शेवटच्या क्षणी उमेदवारांनी कोणत्याही परिस्थितीत आपले ऑनलाईन अर्ज भरून त्याच्या प्रिंटवर स्वाक्षरीसह दुपारी ३ पूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक आहे. त्यानंतर ऑनलाईन भरले असले तरी, कोणाचेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच या कारणावरून कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही, असे देशमुख यांनी सांगितले.

शुक्रवारी अर्ज भरलेल्या प्रमुख उमेदवारांची नावे अशी : महापौर सौ. शैलजा स्वामी, आनंद चव्हाण, अमरसिंह बिसेन, आशीष नेलकर, मिलिंद देशमुख, वैशाली देशमुख, प्रमोद खेडकर, महेश खेडकर, जयश्री पावडे, बाळू खोमणे, राधाबाई हरकरे, ईश्वर येमूल, दीपकसिंह रावत, विनायक सगर, मिना सगर, उज्वला राणे, शिल्पा देशमुख, धम्मपाल भुताडे, शोभा यादव, जयश्री जाधव, बागड्या यादव, आनंद जवादवार, उमेश चव्हाण, ज्योती रायबोले.

## अर्जांची प्रभागनिहाय संख्या

तरोडा (खु.), प्रभाग १ : क-१, ड-३. तरोडा (बु.) प्रभाग २ : अ ते क प्रत्येकी १, ड-४. सांगवी प्रभाग ३ : अ-३, ड-१. हनुमान गड प्रभाग ४ : अ-३, ब-१, क-३, ड-२. प्रभाग ५ भाग्यनगर : अ-१, ब-२, क-२, ड-५. गणेशनगर प्रभाग ६ : अ-३, ब-३, क-१, ड-३. श्रावस्तीनगर प्रभाग ७ : अ-२, ब-३, क-१, ड-१. शिवाजीनगर प्रभाग ८ : अ-३, ब-१, क-४, ड-६. नवा मोंढा प्रभाग : अ-३, ब-४, क-२, ड-३. दत्तनगर प्रभाग १० : क-३, ड-२. हैदरबाग प्रभाग ११ : अ-३, ब-३, क-१, ड-३. उमर कॉलनी प्रभाग १२ : अ-२, ब-३, क-४, ड-६. चौफाळा/मदिनानगर प्रभाग १३ : अ ते ड प्रत्येकी ३. होळी प्रभाग १४ : अ-२, ब-१, क-१, ड-३. इतवारा प्रभाग १५ : ब-३, क-२, ड-२. गाडीपूरा प्रभाग १६ : अ-५, ब-३, क-३, ड-२. गुरुद्वारा प्रभाग १७ : अ-३, ब-३, क-४, ड-३. खडकपूरा/देगावचाळ प्रभाग १८ : अ-२, ब-२. वसरणी/कौठा प्रभाग १९ : अ-१, ब-१, क-१, ड-२. सिडको/वाघाळा प्रभाग २० : ब-१, क-२, ड-१, ई-१.

# अभिनेत्री मयुरी देशमुख करणार मतदानासाठी जनजागृती

## महापालिका निवडणुकीसाठी 'ब्रँड ॲम्बेसीडर'; मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न

अभय कुळकजाईकर

नांदेड, ता. २२ : महापालिका निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी व निर्भय, निपक्षपातीपणे मतदान व्हावे, यासाठी महापालिका प्रशासनातर्फे मतदार जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्यासाठी ब्रँड ॲम्बेसीडर म्हणून 'खुलता कळी खुलेना' या मराठी मालिकेतील मुख्य नायिका मयुरी भाकरे देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मतदानाची टक्केवारी वाढावी आणि जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे, यासाठी जनजागृती करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार महापालिका निवडणुकीमध्ये मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे, यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी गणेश देशमुख यांनी दिली. ते म्हणाले, की शहरातील चौकाचौकात त्याचबरोबर रस्त्याच्या मध्यभागी विद्युत खांबावर होल्डिंग आणि बॅनरच्या माध्यमातन जनजागृती करण्यात येत आहे. शहरातील शाळा, महाविद्यालयातील मुख्याध्यापक, प्राचार्य यांची बैठक घेऊन त्यामध्ये विद्यार्थ्यांना मतदार जागृती प्रतिज्ञा घेण्यात येत आहे. त्याचबरोबर आई, वडील, नातेवाईक, पालक, शेजारी यांनी देखील मतदान करावे, असे आवाहन करण्यासाठी या विद्यार्थ्यांना सांगण्यात येत आहे. हॉटेल व रेस्टॉरंटचे मालक यांचीही बैठक घेऊन मतदान करणाऱ्या मतदारांना जेवणाच्या देयकांमध्ये सुट देण्याविषयी आवाहन करण्यात आले आहे. महाविद्यालयीन स्तराव निवडणूक विषयावर वक्तृत तथा वादविवाद स्पर्धा घ्यावी, अशा सूचनाही करण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर एनसीसी, एनएसएस, स्काऊट, गाईडच्या माध्यमातून जनजागृती करण्यात ये आहे. तसेच पथनाट्य, वासुदेव कव्वाली आदींच्या माध्यमातू मतदार जागृती करण्यात येत आहे महाविद्यालये, धार्मिक स्थळे आद ठिकाणीही मतदार जागृतीसंबं होल्डिंग लावण्यात येत असल्याच माहिती त्यांनी दिली.



मयुरी देशमुख

### मिस कॉल, व्हॉईस कॉलचा वापर

**मतदानाविषयी नागरिकांचा प्रतिसाद घेण्यासाठी ८०००६४४०१८ या मोबाईल क्रमांकावर मिस कॉल देऊन प्रतिसाद घेतला जात असल्याचे सांगून आयुक्त गणेश देशमुख म्हणाले, की शहरातील सुमारे अडीच ते तीन लाख मतदारांना व्हाईस कॉलद्वारे मतदान करण्यासाठी आवाहन करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.**

सुरू ... विषयी आवाहन करण्यात ... माहिती त्यांनी दिली.



नांदेड : मतदान जनजागृतीविषयी पीपल्स महाविद्यालयात गुरुवारी आयुक्त गणेश देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

# मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी युवकांनी पुढे यावे

## आयुक्त गणेश देशमुख यांचे आवाहन

**नांदेड, ता. २२ (बातमीदार) :** नांदेड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीनिमित्त शहरातील नागरिकांमध्ये मतदानाविषयीची जनजागृती करावी, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी गुरुवारी (ता. २१) केले.

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठीच्या सहविचार सभेत त्यांनी आवाहन केले. ते म्हणाले, कोणताही बदल हा युवकच घडवून आणू शकतो. आपले एक मतदान लाख मोलाचे असून एकट्याने मतदान नाही केले तर काय फरक पडतो? मतदानानिमित्त सुटी आहे, त्याचा आनंद उपभोगुया, कुठेतरी सहल काढू या हे विचार म्हणजेच नाकर्तेपणाचा कळस होतो. त्यामुळे 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणेच युवकांनी मतदान करून त्याची जनजागृतीही करावी. आपल्या हातून राष्ट्रीय हिताचे काम घडू द्या, असेही त्यांनी सुचवले.

सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. यू. गवई म्हणाले, मतदानाबाबत जनजागृती व लोकशाहीत मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी महाविद्यालयीन युवकांनी पुढे आले पाहिजे. यंदाच्या महापालिका निवडणुकीत मतदानाच्या टक्केवारीविषयी राज्यात 'नांदेड पॅटर्न' युवकांनी निर्माण करावा, असे मतही श्री. गवई यांनी व्यक्त केले. यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या डॉ. कल्पना कदम, शिवदत्त विभुते, मीडिया कक्षप्रमुख डी. आर. बनसोडे, पीपल्स कॉलेजचे प्रा. डी. जाधव, इंदिरा गांधी महाविद्यालयाचे प्रा. बी. म्हस्के, यशवंत महाविद्यालयाचे अशोक हेबाडे, महिला महाविद्यालयातील श्रीमती सूर्यवंशी आदी उपस्थित होते. डॉ. डी. पवार यांनी प्रास्ताविक केले.

पत्ता : साई कॉम्प्लेक्स, जुने कामठेनु सुपर बाजार,
राठोड कोचिंग क्लासेस जवळ, श्रीनगर, नांदेड. फोन : 02462-256211

# १७४ अर्ज दाखल, आज शेवटचा दिवस...

## शैलजा स्वामी, बंडू खेडकर, गाडीवाले, बाळू खोमणे, रावत, आनंद चव्हाण, मुथा आदींचा समावेश

नांदेड, ता. २२ (बातमीदार) : महापालिका निवडणुकीसाठी शुक्रवारी (ता. २२) १७४ एवढे विक्रमी अर्ज आले असून शनिवारी (ता. २३) अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे गर्दी वाढण्याची शक्यता आहे. गेल्या सात दिवसांत एकूण १९९ अर्ज दाखल झाले असून शुक्रवारी दाखल करण्यात आलेल्या अर्जामध्ये महापौर शैलजा स्वामी, विरोधी पक्षनेते बंडू खेडकर, सभागृह नेते वरिंद्रसिंग गाडीवाले, माजी विरोधी पक्षनेते बाळू खोमणे, दीपकसिंह रावत, माजी उपमहापौर आनंद चव्हाण आदींचा समावेश आहे.

महापालिका निवडणुकीसाठी शनिवारपासून (ता. १६) अर्ज भरण्यास सुरवात झाली. शनिवारी एकच अर्ज दाखल झाला. सोमवारी (ता. १८) चार, मंगळवारी (ता. १९) आणि बुधवारी (ता. २०) प्रत्येकी दोन तर गुरुवारी (ता. २१) १६ अर्ज दाखल झाले होते. शुक्रवारी (ता. २२) १७४ एवढे विक्रमी अर्ज दाखल झाले असून इच्छुक उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. शनिवारी (ता. २३) शेवटचा दिवस असल्यामुळे गर्दी वाढण्याची शक्यता असून त्या दृष्टीने निवडणूक कार्यालयाच्या सातही ठिकाणी पुरेसा पोलिस बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

शुक्रवारी उमेदवारी अर्ज भरणाऱ्यांमध्ये महापौर शैलजा स्वामी, माजी महापौर अजयसिंह बिसेन, माजी उपमहापौर आनंद जाधव, विरोधी पक्षनेते बंडू खेडकर, सभागृह नेते वरिंद्रसिंग गाडीवाले, माजी विरोधी पक्षनेते बाळू खोमणे, दीपकसिंह रावत, ईश्वर येमूल, नगरसेवक किशोर यादव, संदीप चिखलीकर, नगरसेविका वैशाली देशमुख, जयश्री जाधव, जयश्री पावडे, विनायक सगर, यादवराव कल्याणकर, कांता मुथा, डॉ. शीतल वैद्य, आरती सौदे, कुणाल कंदकुर्ते, शालिनी पवळे, प्रदीप जाधव, परमजित कौर, बालाजी चव्हाण, अब्दुल हबीब बावजीर, अर्शद बेग, मीना सगर, शिल्पा देशमुख, राजेश देशमुख, गजानन देशमुख, प्रभा साठे आदींचा समावेश आहे. शनिवारी (ता. २३) शेवटचा दिवस असून दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज दाखल करण्यात येत असल्यामुळे इच्छुक उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांची चांगलीच धावपळ होत आहे. सोमवारी (ता. २५) सकाळी ११ वाजल्यापासून दाखल करण्यात आलेल्या अर्जांची छाननी करण्यात येणार आहे.

### सनियंत्रण समितीची बैठक

दरम्यान, निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार सनियंत्रण समितीची शुक्रवारी सायंकाळी बैठक घेण्यात आली व त्यात आढावा घेण्यात आला. या वेळी जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, आयुक्त गणेश देशमुख, पोलिस अधीक्षक चंद्रकिशोर मीना यांच्यासह निवडणूक निर्णय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विभागाने करावयाची कामे तत्काळ पूर्ण करावीत त्याचबरोबर कोणताही अनुचित प्रकार किंवा अप्रिय घटना घडणार नाही, याकडे कटाक्षाने लक्ष देऊन त्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात. नियमित दैनंदिन आढावा व समन्वय ठेवून कामे पूर्ण करावीत आदी सूचनाही या वेळी देण्यात आल्या.

---

## ...ांतच ११ जण जेरबंद

## डेंगी रुग्णांची संख्या नऊवर

## कहाणी एका राजीनामानाट्याची !